प्रसिध्दी पत्रक दिनांक : २०/१०/२०२३

**तक्रारदार यांचे महाराष्ट्र ग्राम रोजगार हमी योजनेचे ऑनलाईन ई–मस्टर बिले सादर करण्याकरीता डाटा एन्ट्री ऑपरेटर शिवराज दत्तराम नकाते यांनी १,२००/– रूपयांची लाच स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पो.स्टे. नायगाव गुरनं १६५/२०२३ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ |
| गुन्हा दाखल तारीख व वेळ | दिनांक १९.१०.२०२३ रोजी १९.५४ वा. |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | शिवराज दत्तराम नकाते, वय ३६ वर्षे, लिपिक तथा डाटा एन्ट्री ऑपरेटर (कंत्राटी), नेमणुक तहसील कार्यालय, नायगाव (खै), अतिरिक्त कार्यभार पंचायत समिती, नायगाव (खै.), ता.नायगाव, जि. नांदेड. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,५००/– रूपये |
| लाच स्विकारली रक्कम | १,२००/– रूपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांची मौ. आंतरगाव, ता. नायगाव येथे शेत गट क्र. ५९२ मध्ये वडिलोपार्जित ३४ गुंठे शेत जमीन आहे. त्या शेत जमिनीवर सन २०२१–२०२२ मध्ये पंचायत समिती, नायगाव यांचे कडून फळबाग लागवडी साठी रोजगार हमी योजने अंतर्गत एकूण १,५०,०००/– रुपयांचे शासकीय अनुदान मंजूर झाले आहे. नमूद शेत जमिनीत तक्रारदार यांनी २५० पेरूंच्या झाडाची लागवड केली आहे. झालेल्या कामाचे एकूण ३ टप्यात प्रत्येकी ४५,०००/–रुपये प्रमाणे १,३५,०००/–रुपये शासकीय अनुदानाची रक्कम तक्रारदार यांना यापुर्वी मिळाली आहे. चौथा टप्यातील झालेल्या कामाचे ई–मस्टर मागणी अर्ज, तक्रारदार यांनी पंचायत समिती, नायगाव येथे केला होता. परंतु तक्रारदार यांचे शेतात शेतमजुरांनी केलेल्या कामाचे शासकीय अनुदानाचे बिल मिळाले नसल्याने तक्रारदार हे पंचायत समिती, नायगाव येथे गेले. त्यावेळी झालेल्या कामाचे बिल ऑनलाईन झाले नसल्याची माहिती मिळाली. त्यामुळे तक्रारदार यांनी रोजगार हमी योजनेचे ऑनलाईन ई–मस्टर बिले सादर करणारे डाटा एन्ट्री ऑपरेटर नकाते यांची भेट घेतली. त्यावेळी नकाते यांनी १,५००/– रुपये लाचेची मागणी केली. सदरचे १,५००/– रुपये हे लाच असल्याची तक्रारदार यांना खात्री झाल्याने त्यांना ती द्यावयाची नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे याबाबत तक्रार दिली.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथील सापळा पथकाने दि. १९.१०.२०२३ रोजी लाच मागणी पडताळणी केली. पडताळणीच्या दरम्यान यातील डाटा एन्ट्री ऑपरेटर (कंत्राटी) इलोसे शिवराज दत्तराम नकाते यांनी तक्रारदार यांना शासकीय पंचासमक्ष ऑनलाईन ई–मस्टर बिले सादर करण्यासाठी १,५००/– रुपयाची मागणी केली. तडजोडीअंती १,२००/– रुपये लाचेची मागणी केली.<br>त्यानंतर डाटा एन्ट्री ऑपरेटर इलोसे नकाते यांनी १,२००/–रुपयाची लाच शासकीय पंचासमक्ष स्विकारली म्हणुन त्यांचे विरूध्द पोलीस स्टेशन नायगाव, जि. नांदेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| सापळा पथक | सदरची कार्यवाही ला.प्र.वि.नांदेड परिक्षेत्र नांदेड चे डॉ.श्री राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, यांचे मार्गदर्शनाखाली, पर्यवेक्षण अधिकारी श्री राजेंद्र पाटील, पोलीस उप अधीक्षक तसेच सापळा कार्यवाही पथक पोलीस निरीक्षक श्री.संदिप थडवे, सपोउपनि/गजेंद्र मांजरमकर, पोकॉ/यशवंत दाबनवाड, पोकॉ/ईश्वर जाधव, चापोह/मारोती सोनटक्के, सर्व लाप्रवि नांदेड युनिट |
| गुन्हयाचा तपास | श्री.संदिप थडवे, पोलीस निरीक्षक, अँटी करप्शन ब्युरो, नांदेड |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
|---|---|
| संपर्क कमांक :– 02462–253512<br>टोल फ्री कमांक– 1064 | ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9623999944 | पोलीस उपअधीक्षक 7350197197 |
| ई–मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | ई–मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| FACEBOOK – Dysp Acb Nanded | TWITTER - @ACBnanded |
| INSTAGRAM – acb_nanded | |

कार्यालय पोलीस उप अधीक्षक ला.प्र.विभाग,नांदेड युनिट

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

Scanned with CamScanner